# वसई - विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती

ठराव क्र. २ दिनांक. २३/०२/२०१५

प्रस्तावाचा विषय:- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९८ अन्वये वसई - विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेचे सन २०१४-१५ च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन २०१५-१६ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज "ब" मा. स्थायी समितीने विचारात घेऊन निर्णय घेणे.

प्रस्तावाचा मजकुर :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९८ प्रमाणे २०१४-१५ च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन २०१५-२०१६ चे अंदाज पत्रक "ब" मा. परिवहन समितीने तयार करुन मा. स्थायी समितीपुढे सादर करण्यास शिफारस केली आहे. सदर बाबत विचार विमर्ष करुन निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णय :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९८ (३) नुसार मा. परिवहन समितीने शिफारस केलेले सन २०१४-१५ च्या सुधारित अर्थसंकल्पासह सन २०१५-१६ चे अंदाज पत्रक "ब" बाबत सविस्तर विचार विमर्ष करणेत आला. मा. परिवहन समितीच्या शिफारशी कायम करुन परिवहन समितीचे एकूण कामकाजासाठी सन २०१४-१५ साठी अपेक्षित ₹ १० कोटी ०८ लक्ष ९८ हजार अंशदान वर्ग करणे तसेच सन २०१५-१६ साठी ₹ ३५ कोटी २३ लक्ष ८४ हजार महानगरपालिका अंशदान वर्ग करणेची तरतुद अ अंदाजपत्रकात करणेस तद्धतच सन २०१५-१६ मध्ये ₹ ५० कोटी इतके अर्थसहाय्य वित्तीय संस्थांकडून मिळवणेस अथवा त्याऐवजी महानगरपालिका अंशदान वर्ग करणेस शिफारस करणेत आली.

१) मा. स्थायी समितीने दिनांक २३/०२/२०१५ ते २४/०२/२०१५ या कालावधी सविस्तर विचार विमर्ष करुन मा. महासभेपुढे सादर करणेस शिफारस केलेल्या परिवहन उपक्रमाच्या सन २०१४-१५ च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

**(₹ लाखात)**

| **अ.क्र.** | **लेखाशिर्ष** | **मा. स्थायी समितीने शिफारस केलेले परिवहन उपक्रमाचे अंदाज** | |
|---|---|---|---|
| | | **सुधारित अर्थसंकल्प सन २०१४-२०१५** | **मुळ अंदाज सन २०१५-१६** |
| १ | जमा रकमा | ₹ १००९.८३ | ₹ १४९०७.६९ |
| २ | खर्च रकमा | ₹ १००८.८२ | ₹ १४९०६.६८ |

सुचकाचे नाव :- श्री.

व स्वाक्षरी :-

अनुमोदकाचे नाव :- श्री.

व स्वाक्षरी :-

अनुकुल संख्या :- प्रतिकुल संख्या :- तटस्थ संख्या:-

ठराव सर्वानुमते मंजूर

( )

सभापती तथा पिठासीन प्राधिकारी

स्थायी समिती

वसई विरार शहर महानगरपालिका